# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

## परिपत्रक क्र :पवमूमाविगोक/२०२६ -4048

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थाचे संचालक यांना कळविण्यात येते की,**मार्च/एप्रिल-२०२६** मध्ये होणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा दिनांक ०७.०४.२०२६ पासून घेण्यात येणार आहेत. पदव्युत्तर परीक्षा दिनांक लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

सर्व महाविद्यालयाना विद्यापीठाच्या **www.bamua.digitaluniversity.ac** या संकेतस्थळावर **(QPDS) Link** देण्यात आलेली आहे. तरी सर्व महाविद्यालयानी त्यांची पुर्ण माहिती **Online** पध्दतीने **दिनांक. ३०.०३.२०२६** पर्यंत भरावी. सदर माहिती ही सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, व्यावसाईक, अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र व इतर सर्व अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी **(QPDS) Link** मध्ये माहिती भरणे अनिवार्य आहे. तसेच दिनांक ०१.०४.२०२६ पासून Mock Drill डेमो घेण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**(QPDS) लॉगीन बाबात महत्वाच्या सूचना :-**

| | |
|---|---|
| ०१ | **Google Information Form (QPDS) Link:** महाविद्यालयातील प्राध्यापकांना परीक्षा केंद्र प्रमुखांनीच QPDS Link मध्ये माहिती भरावी त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती सादर करु नये. युजर आणि पासवर्ड फक्त प्राचार्य तथा परीक्षा केंद्र प्रमुख यांनाच देण्यात येईल. इतर शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सदरची माहिती सादर करुनये तसे आढळल्यास गैरमार्गाचा अवलंब समजण्यात येईल. |
| ०२ | लॉगीन मध्ये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याची माहिती भरु नेय. याची जबाबदारी संबंधीत परीक्षा केंद्रप्रमूखांची राहील, याची नोंद घ्यावी. |
| ०३ | लॉगीन मध्ये फोटो अपलोड करत असताना प्राचार्य आणि ज्या प्राध्यापकांना केंद्रप्रमूखांची जबाबदारी देण्यात आलेली आहे त्यांचा फोटो अपलोड करण्यात यावा. |
| ०४ | महाविद्यालयास दिलेल्या लॉगीन मध्ये पाठविण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिका कक्षामध्ये केंद्र प्रमुख वगळता इतर कोणत्याही व्यक्तीला मोबाईल वापरण्याची परवानगी परीक्षा केंद्रांवर असणार नाही. परीक्षा सुरळीत पार पाडणे, गोपनीयता राखणे आणि गैरप्रकार रोखण्याची मुख्य जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य तथा परीक्षा केंद्र प्रमुख यांची असेत. परीक्षा केंद्रावर होणाऱ्या कोणत्याही गैरप्रकारासाठी वैयक्तिकरित्या जाबाबदार असतील याची गांर्भीयाने नोंद घ्यावी. |
| ०५ | परीक्षा सुरु झाल्यानंतर उपपस्थिती /अनुपस्थिती (Present/Absent) त्याच दिवशी संबंधित पोर्टलच्या लॉग-इनमध्ये नमूद करणे अत्यंत अनिवार्य आहे. |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Chhatrapati Sambhajinagar *

तसेच वरील सूचनेप्रमाणे परीक्षेसाठी माहिती भरत असतांना फक्त प्राचार्य आणि केंद्र प्रमुखांनीच माहिती भरणे बंधनकारक राहील. महाविद्यालयाने सादर केलेल्या माहितीनुसार (QPDS) लॉगीन देण्यात येईल. लॉगीन दिल्यानंतर सदरबाब महाविद्यालयाचे प्राचार्य/परीक्षा केंद्रप्रमुख यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीस याची माहिती नसावी, या संबंधित गोपनीयतेचे पालन करण्यात यावे. महाविद्यालयाकडून (QPDS) लॉगीन बाबत गैरवापर झाल्यास संबंधित प्राचार्य/परीक्षा केंद्रप्रमुख जवाबदार असतील, व सदर परीक्षेच्या कामात काही गैरप्रकार आढळल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

एखाद्या महाविद्यालयाने माहिती सादर न केल्यास, अशा महाविद्यालयांचे विद्यार्थी परीक्षेपासून वंचीत राहू शकतील, त्यामुळे सर्व महाविद्यालयांनी माहिती सादर करणे अनिवार्य व क्रमप्राप्त आहे, याऊपरही एखाद्या महाविद्यालयाने माहिती सादर न केल्यास विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्यांची राहील. याची कृपया नोंद घ्यावी.

सदर माहिती ही अचूक भरणे बाबतची दक्षता/नोंद सर्व प्राचार्य/परीक्षा केंद्र प्रमुख यांनी घ्यावी व माहिती विहित मुदतीत भरुण विद्यापीठ प्रशासनास सहकार्य करावे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**विद्यापीठ प्रांगण,**
**छत्रपती संभाजीनगर**
संदर्भ क्र: परीक्षा व मूल्यमापन/गोपनिय/२०२६
दिनांक;-१६.०३.२०२६
प्र.क्र. 4048

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Chhatrapati Sambhajinagar *